REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# डॉ. बी. आर. आंबेडकर यांची वाचन अभिरूची

ज्योती शा. मगर
ग्रंथपाल , महिला कला महाविद्यालय, बीड.

**सार –**



युगपुरुष डॉ. भीमराव रामजी तथा बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन कार्य आणि विचारयांची संबंध विसाव्या शतकावर खोल मुद्रा उमटलेली आहे. भारतीय समाजातील दलित, पीडित, निरक्षर, माणसांमध्ये आपण माणूस आहोत याची जाणीव निर्माण करण्यासाठी आणि त्यांना माणूसपणाचे हक्क मिळवून देण्यासाठी आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी चळवळी केल्या, संघटना उभारल्या, वृत्तपत्रे चालवली, लढाऊ नेतृत्वापासुन भारतीय संविधानाच्या रचनेपर्यंत वेगवेगळया स्थरांवरील बहुविध स्वरुपाचे कार्य केले. पत्रकार, विद्वान, संशोधक, धर्म प्रवर्तक असे जीवनाचे भिन्न भिन्न पैलू असलेल्या डॉ. आंबेडकरांचे ग्रंथकर्तृत्वही विशाल आहे. प्रस्तुत लेखात दिलेल्या ग्रंथसूचीवरुन ते सहजच स्पष्ट होईल.

**कळशब्द (keyword) :** विचारधन,डॉ. बाबासाहेब आंबेडकर पृ.नं.२, वाचन अभिरुची आणि परिशिष्टये

## १. प्रस्तावना –

'शिक्षण, संघटन, संघर्ष आणि धम्मचक्र प्रवर्तन यांच्या साहाय्याने हजारो वर्ष अस्पृश्यतेच्या व गुलामगिरीच्या खाईत लोटल्या गेलेल्या लाखो दलित पीडितांचे पुनरुत्थान करणारे महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.'

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १८९१ मध्ये महू (मध्यप्रदेश) येथे झाला तत्कालीन प्रखर अशा सामाजिक विषमतेमुळे बालपणीच त्यांच्या मनावर वाईट अनुभव कोरले गेले. पुढे १९१३ ला जेव्हा बडोद्याच्या महाराजा सयाजीराव गाकवाड यांनी दिलेल्या शिष्यवृत्तच्या आधारे अमेरिकेला गेले तेंव्हा त्यांना अस्पृश्यतेचा काहीच त्रास झाला नाही. या परस्परविरोधी अनुभवांचा विचार करुन त्यांनी आपल्या देशाला व समाज बांधवांना या सामाजिक विषमतेच्या विळख्यातून बाहेर काढायचे मनोमन ठरवले.

भारतात आल्यावर सामाजिक विषमता दूर करण्याच्या हेतूने अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजाची कैफियत समाजासमोर मांडण्यासाठी, त्यांनी मूकनायक (१९२०), बहिष्कृत भारत (१९२७), जनता (१९३०) आणि प्रबुध्द भारत (१९५६) अशी वृत्तपत्रे चालवली या काळात जी काही वृत्तपत्रे महाराष्ट्रात होती त्यातून अस्पृश्यांचे प्रश्न मांडले जात नव्हते.

डॉ. आंबेडकर यांच्यावर संत कबीर, महात्मा ज्योतीराव फुले व राजर्षी शाहु महाराज या व्यक्तीमत्त्वांचा त्यांच्या विचारांचा व कार्याचा मोठा प्रभाव होतो. डॉ. आंबेडकर हे कर्म सुधारक होते सर्व माणसे समान आहेत. कोणीही उच्च किंवा नीच नाही अशी त्यांची ठाम धारणा होती. जातीय उतरंड, चतुर्थ व्यवस्था, या व्यवस्थेत शूद्र मानल्या गेलेल्या जातीवर होणारे प्रत्येक कृतीतून त्यांनी समानतेचे धडे दिले. डॉ. आंबेडकरांनी १९२७ ला महाडच्या (जि. रायगड) चवदार तळयावर अस्पृश्यांना देखील पाणी

भरता यावे यासाठी सत्यागृह केला. स्वतः डॉ. आंबेडकर जरी हिन्दु देव देवतांना मानत नव्हते तरीही त्यांनी १९३० ला नाशिक येथे काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्यागृह सुरु केला. कारण जर मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळाला तर त्यामुळे अस्पृश्यतेचा प्रश्न सुधरण्यास हातभार लागेल. असे त्यांचे मत होते. हा सत्याग्रह केवळ त्या तळयापुरते किंवा मंदिरापुरते मर्यादित नव्हते. तर तो लढा मानवाने सन्मानो जगण्याच्या हक्कांसाठी होता.[५]

मनुस्मृती या ग्रंथाचे जाहीर दहनही केले. १९१७ ते १९३५ या काळात हिंदु धर्मात राहूनच त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. १९३५ मध्ये त्यांनी मी हिंदु म्हणून जन्मास आलो तरी हिंदु म्हणून मरणार नाही अशी घोषणा येवला येथे केली. १९५६ मध्ये सुमारे पाच लाख अस्पृश्य बांधवांसह बौध्द धर्माची दिक्षा घेऊन डॉ. आंबेडकरांनी धर्म परिवर्तनाची घोषणा प्रत्यक्षात आणली (दि. १४ ऑक्टोंबर १९५६, नागपूर)

१९३० ला गोलमेज परिषदेच्या वेळी त्यांनी ब्रिटिशांना भारत सोडावा असा सल्ला दिला होता. आपल्या शालेय व महाविद्यालयीन जीवनात रोज १८-१८ तास अभ्यास करणारे डॉ. आंबेडकर शिक्षणाचे महत्व चांगल्या प्रकारे ओळखून होते. शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी त्यांनी मुंबई येथे १९४६ मध्ये सिध्दार्थ महाविद्यालयाची स्थापना केली. तसेच त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी आणि डिप्रेस्ड क्लास एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थाची देखील स्थापना केली.

१९२४ मध्ये बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन केली. १९२० ला सुवर्णाच्या अन्याय व अत्याचारापासून दलितांचे संरक्षण करावे या हेतुने शिस्तबध्द असे समता सैनिक दल स्थापन केले. १९३६ साली त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. १९४२ साली अखिल भारतीय शेडयूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. पुढे अखिल भारतीय स्तरावर रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याचे त्यांनी ठरवले होते. परंतु दुर्देवाने त्यापूर्वीच त्यांचे निधन झाले[२].

## २. विचारधन -

फक्त वही पेन म्हणजे शिक्षण नव्हे तर बुध्दीला सत्याकडे, भावनेला माणुसकीकडे, शरीराला श्रमाकडे नेण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण : जसे जेवल्यावर होणारे समाधान हे तात्पुते असते या उलट शिक्षणातुन मिळणारी ज्ञानाची शिदोरी आयुष्यभर पुरते पोटाची भूक भागवावीच, पण एक पाऊल पुढे टाकून शिक्षण घेऊन माणसाने बुध्दीची ही भूक भागवावी.

जसा माणूस उपासमारीने अशक्त होऊन अल्पायुषी होतो. तसा तो शिक्षण अभावी जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो[६].

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर -

जेंव्हा ईश्वराने मानवाची निर्मिती केली तेंव्हा त्याने मानवला तीन पाने दिली पहिल्या पानावर जन्म लिहिला आणि तिसऱ्या पानावर मृत्यू लिहिला दुसरे पान कोरे ठेवले ते मानवाच्या हातात आहे. मानव जसा जसा जगतो तसे ते पान भरत जाते या दुसऱ्या पानालाच जिवन म्हणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले पूर्ण जीवन या दुसऱ्या पानालाच अर्पण केले. म्हणून त्यांचे दुसरे पान वाचन अभिरुची पूर्ण ठरते.

## ३. पृष्ठ नं. २ चा ऐतिहासिक आढावा[२] -

- १८४८ रामजी मालोजी सकपाक (डॉ. आंबेडकरांचे वडील) यांचा जन्म झाला.
- १८५२ महात्मा ज्योतीबा फुले यांनी पुण्यात अस्पृश्य मुला मुर्लींसाठी पहिली शाळा सुरु केली.
- १८५४ भीमाबाई धर्माजी मुरबाडकर (डॉ. आंबेडकरांची आई ) यांचा जन्म झाला.
- १८५८ सर्व सरकारी शाळांमधून अस्पृश्य मुलांचा प्रवेश देण्यात यावा अशी ब्रिटिश सरकारने सूचना केली.
- १८६७ रामजी मालोजी सकपाल यांचा सुभेदार मेजर मुखाडकरांची मुलगी भीमाबाई यांच्याशी विवाह झाला.

- १८६८ महात्मा फुले यांनी पुणे येथील आपल्या वाडयातील विहिर अस्पृश्यांसाठी खुली केली.
- १८९६ धिन्नू धोत्रे वशंदकर यांची कन्या रामीबाई (डॉ. आंबेडकरांची पत्नी ) यांचा जन्म झाला.
- १९०२ कोल्हापूरच्या शाहू छत्रपतीनी संस्थानाच्या सेवेत मागासवर्गीयांसाठी ५० टक्के जागांचे आरक्षण.
- १९०७ भीमराव मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले.
- भीमराव आंबेडकर यांचा रामीबाई उर्फ रमाबाई यांच्या सोबत विवाह झाला.
- १९०८ भीमरावांनी एल्फिन्स्टन कॉलेज मध्ये प्रिव्हीयसच्या वर्गात प्रवेश घेतला.
- १९११ महाराज सयाजीराव गायकवाड यांनी भीमरावाच्या महाविद्यालयीन शिक्षणासाठी दरमहा २५ रुपयांची शिष्यवृत्ती देण्याचे अभिवचन दिले.
- १९१२ मध्ये डॉ. आंबेडकराच्य यशवंत या जेष्ठ मुलाचा जन्म (१२ डिसेंबर) बडोद्याच्या महारजांनी वार्षिक २३० पौंडची शिष्यवृत्ती मंजुर केली. (२ वर्षासाठी)
- डॉ. आंबेडकरांनी न्यूयार्क येथील कोलंबिया विद्यापीठातील राज्यशास्त्र विषयात प्रवेश घेतला.
- १९१३ मध्ये डॉ. आंबेडकर मुंबई विद्यापीठाचे बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले.
- १९१५ डॉ. आंबेडकर कोलंबिया विद्यापीठाची एम.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले (अर्थशास्त्र विषयात)
- १९१६ कोलंबिया विद्यापीठातील समाजशास्त्राचे प्रोफेसर डॉ.ए.ए. गोल्डनविजर यांच्या ॲंथ्रपॉलीजी सेमिनारच्या चर्चासत्रात डॉ. आंबेडकरांनी कास्ट्स इन इंडिया हा आपला विचार प्रवर्तक निबंध वाचला तो इंडियन ॲण्टिक्वेरीच्या मे १९१७ च्या अंकात प्रसिध्द झाला.
- डॉ. आंबेडकर अमेरिकेतून निघाले (मे) आणि त्यांनी लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पोलिटिकल सायन्स या संस्थेत मास्टर ऑफ सायन्स (इकॉनॉमिक्स) आणि डॉक्टर ऑफ सायन्स या पदव्यांसाठी प्रवेश घेतला (ऑक्टोबर) त्याच वेळी त्यांनी बॅरिस्टर ॲट लॉ या उपाधिसाठी ग्रेज इन संस्थेत प्रवेश घेतला.
- डॉ. आंबेडकरांनी पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला इ नॅशनल डिव्हीडंड ऑफ इंडियाः ए हिस्टॉरिकल ॲण्ड ॲनालिटिकल स्टडी हा प्रबंध कोलंबिया विद्यापीठाने स्विकारला.
- १९१७ बडोदा सरकारने दिलेल्या शिष्यवृत्तीची मुदत संपल्याने डॉ. आंबेडकरांना आपला अभ्यासक्रम पूर्ण झालेला नसतांनाही भारतात परतावे लागले.
- १९२३ डॉ. आंबेडकरांना लंडन विद्यापीठाने डी.एस्सी. उपाधि प्रदान केली (नोव्हेंबर)
- १९२७ डॉ. आंबेडकरांचा मुंबई विधिमंडळ सदस्य म्हणून शपथविधी झाला (१८ फेब्रुवारी)
- १९२८ डॉ. आंबेडकरांची सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली (जुन)
- १९३० डॉ. आंबेडकरांची मुंबई विद्यापीठाच्या निवड समितीवर नियुक्ती झाली (८ जुलै)
- १९३३ डॉ. आंबेडकर यांना मुंबई विद्यापीठाच्या कला आणि कायदा शाखेचे फेलो होण्याचा सन्मान मिळाला.
- १९३५ डॉ. आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे मुंबईत निधन झाले (२७ मे)
- १९३५ डॉ. आंबेडकर मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी नियुक्ती (१ जुन)
- १९३७ मुंबई विधिमंडळाच्या सार्वत्रिक निवडणुकामध्ये स्वतंत्र मजुर पक्षाचे डॉ. आंबेडकरांसहीत १४ उमेदवार निवडून आले.
- १९३९ बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांचे मुंबईत निधन झाले (६ फेब्रुवारी)
- १९४० डॉ. आंबेडकरांचा ' थॉट्स ऑन पाकिस्तान' हा ग्रंथ प्रकाशित झाला (२७ डिसेंबर)
- १९४२ मध्ये प्रथमच अस्पृश्य व्यक्तीची केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री म्हणून नियुक्ती झाली (२ जुलै)
- १९४६ डॉ. आंबेडकरांचा विधिमंडळातून घटना समितीवर निवडून आले. (१९ जुलै)
- डॉ. आंबेडकरांचा 'ह वेअर द शूद्राज' ग्रंथ प्रकाशित झाला. (१३ ऑक्टोबर) हा ग्रंथ त्यांनी महात्मा फुले यांना अर्पण केला होता.
- १९४७ भारताचे कायदेमंत्री म्हणून डॉ. आंबेडकरांचा मंत्रीमंडळात समावेश झाला(३ ऑगस्ट)
- भारत स्वतंत्र झाला (१५ ऑगस्ट)

- घटना मसुदा समितीने डॉ. आंबेडकरांची एकमताने अध्यक्ष म्हणून निवड केली (३० ऑगस्ट)
- १९४९ घटनेचा अंतिम मसुदा अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सादर केला. (२५नोव्हेंबर)
- भारताची राज्यघटना स्विकृत झाली (२६ नोव्हेंबर)
- १९५० स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ. आंबेडकरांनी शपथ घेतली. (८ मे)
- १९५२ कोलंबिया विद्यापीठाचे डॉ. आंबेडकरांना न्युयॉर्क येथे सामान्य एल.एल.डी. उपाधि बहाल केली (५ जून)
- १९५३ उस्मानिया विद्यापीठाने डॉ. आंबेडकरांना सन्मान डी.लिट उपाधि प्रधान केली. (१२ जानेवारी)
- डॉ. आंबेडकरांनी रंगून (ब्रम्हदेश) येथे बुध्द जयंती महोत्सवात भाग घेतला.
- १९५५ डॉ. आंबेडकरांनी द बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेची स्थापना केली. (५ मे)
- १९५६ अशोक विहार येथील कार्यक्रमात तिबेटचे धर्मगुरु दलाई लामा यांनी डॉ. आंबेडकरांचा गौरव केला ( डिसेंबर)
- डॉ. आंबेडकरांचे दिल्लीमध्ये २६, आलीपूर रोड या निवासस्थानी मत परिनिर्वाण झाले (६ डिसेंबर)

## वाचन अभिरुची :-

प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे[३]. म्हणूनच हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाली की तो किंवा ती पूर्णपणे सुशिक्षित, माहिती पूर्ण व गुणवत्ता प्राप्त करुनच बाहेर पडावी. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे. म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ग्रंथसंपदा इंग्रजी भाषेत आहे. मात्र त्यांचे मराठी लेखन त्यांनी स्थापिलेल्या मूकनायक, बहिष्कृत भारत आणि जनता या पत्रात आहे किंचित पुरुषार्थ, केसरी, धनुर्धारी यांतही त्यांचे लेखन आढळते. मातृभाषा मराठी आहे. म्हणूनच त्यांचे मराठी वाङ्मयावर प्रेम होते असे नाही तर वाङ्मय अभिरुची आणि मराठीतील काही वाङ्मयीन गुणवत्ता असलेल्या ग्रंथाच्या परिशिलनातून त्यांनी मराठी वाङ्मयाविषयी काही मते सिध्द झाली आहेत. त्यांनी आपल्या स्नेहांना मराठी ग्रंथ पाठविण्यासंबंधी लिहिलेली पत्रे लिहिलेली सावकार चरित्र, लक्ष्मीबाई, टिळकांचे स्मृतिचित्रे पाठविण्यास त्यांनी दादासाहेब गायकवाड यांना सुचविले होते. (पत्र दि. २२.०६.१९६१) सी.ना. शिवतरकरांना लिहितांना गडकऱ्यांची नाटके पाठवा. भावबंधन पोहचले (पत्र दि. ०६ ऑक्टो. १९२० व १० फेब्रुवारी १९२१) असे कळविले होते. न.चि.केळकर, प्रा. व्ही.बी. कदम यांनाही ग्रंथ पाठविण्यासंबंधी पत्रे लिहिले होते. संत साहित्याचा तर त्यांचा प्रगाढ अभ्यास होता ज्ञानेश्वरीतील गीताप्रणीत तत्वज्ञान त्यांना मान्य नव्हते मात्र ज्ञानेश्वरीतील भाषा वैभवाने आपण दिपलो आहेत अशी कबूली त्यांनी दिली होती. हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्या आपण आधीर होऊन वाचल्या असे त्यांनी ह.वि. देसाई यांना मुलाखतीत सांगितले होते. रामदासांच्या कर्मठ ब्राम्हणी वृत्तीवर त्यांनी ताशेरे ओढले आहेत. म.फुले, टिळक, आगरकर, लोकहितवादी विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेखन त्यांनी काळजीपुर्वक अभ्यासिले होते.[१]

संग्रहातील डॉ. बाबासाहेबांच्या ग्रंथालयाच्या वैभवाने दिपून गेलेल्या हरिभाऊ पगारे या लेखकाने मराठीच्या ग्रंथ दालनाचा निर्देश करतांना लिहिले, पुर्व भाग हा मराठी पुस्तकांनी भरलेला आहे. त्यामध्ये हिन्दी संस्कृती आणि अहिंसा, भगवदगीता, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, डॉ. केतकर त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील सर्व संत तालिका, सार्थ ज्ञानेश्वरी इत्यादी पुस्तकांच्या संग्रहाने हा भाग प्रसिध्द आहे. (डॉ. आंबेडकरांचा ग्रंथ संग्रहः हरिभाऊ पगारे, जनता खास अंक १४ एप्रिल १९४२ ) डॉ. बाबासाहेबांचा सहवास लाभलेला व एकेकाळचे सिध्दार्थ महाविद्यालयाचे ग्रंथपाल व लेखक शा. शं. रेगे यांनीही बाबासाहेबांच्या ग्रंथसंग्रहाचा अपूर्व आणि प्रचंड असाच गौरव केला आहे.[४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र वाङ्मय महारष्ट्र शासन क्रमशः प्रसिध्द प्रकल्पांतर्गत ८ इंग्रजी खंड प्रसिध्द केले. शिवाय सोअर्स मटेरियल ऑन डॉ. आंबेडकर या नावाचा त्यांचा चळवळी विषयक

अभ्यासाच्या साधनाचा एक खंड देखील प्रसिध्द केला. या मालीकेत प्रस्तुत ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक हा पहिलाच मराठी खंड प्रसिध्द होत आहे. आंबेडकरांचे जास्तीत जास्त मराठी लेखन या दोन वृत्तपत्रातून प्रसिध्द झालेले आहे. यामुळे त्यांच्या विचारांची व तत्कालिन चळवळीची सामान्य वाचकाला देखील साकल्याने जाणीव झाली आहे.

स्वभूमित स्वलोकात, स्वधर्मास, स्वाचारामः राहून अविचारी अज्ञान देशबांधवांच्या निंदेश किंवा छळास न भिता त्यांच्याशी कधी भांडून कधी युक्तिवाद करुन कधी लाडीगोडी लावून अथवा सामर्थ्य दाखवून कधी दटावून त्यांची सुधारणा करणे यातच खरी देशाप्रती, खरी बंधुत्व, खरा देशाभिमान, खरे शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे.

यापध्दतीने मानवाला सकारात्मक करण्याचे शिकवण डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी अखिल मानवी धर्माला शिकवण दिली.

## ५. निष्कर्ष –

शिक्षणाप्रती असणारी आस्था, जिवाळा, प्रेम आणि करुणा हे गुणधर्म मानवाने आंगिकारावेत असे डॉ. बी.आर. आंबेडकर यांना नेहमी वाटत असे म्हणून यांनी १९६४ मध्ये सिध्दार्थ महाविद्यालयाची स्थापना केली तसेच त्यांनी पिपल्स एज्युकेशन सोसायटी आणि डिप्रेस्ड क्लास सोसायटी चा शैक्षणिक संस्थाची देखील स्थापना केली, फक्त वही पेन म्हणजे शिक्षण नव्हे तर मानवाला सत्याकडे नेण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण होय हे सांगणारे राज्यघटनेचे शिल्पकार अस्पृश्योध्दारक असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ५ डिसेंबर १९५६ ला हे जग सोडून गेले.

## संदर्भ –


1. खरात, शंकरराव (संपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रेः श्री लेखन वाचन भांडार पुणे १९६१ पृ. ७,६
2. डहाळे, वसंत आबाजी (संपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकवाङ्मय, गृह, मुंबई २००७, पृ. २६५–२७५
3. मून, वसंत आणि नरके हरी (संपा), बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९० पृ. ९–११
4. पनतावणे, गंगाधर , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, प्रतिभा प्रकाशन, पुणे, १९९८ पृ. ११–१२
5. www. dr.babasaheb ambedkar.in
६. www. marathisuvichar.in
७. www.dr. babasaheb ambedkar books
८. www. Marathi matee.in


## परिशिष्ट्ये[७] –

1. The Evolution of Provincial Finance in British India. - P.S. King & Co, London
2. Castes in India : Their Mechanism, Genesis and Development - Indian Antiquary, May 1917
3. A Review of Bertrand Russell's 'Principles of Social Reconstruction' - Journal of Indian Economic Society, March 1918.
4. 'Problem of the Rupee' - 'History of Indian Currency and Banking', May 1947.
5. 'Anohilation of Castes' - 15 May, 1936.
6. 'Thoughts on Pakistan' - 1940, Second revised edition was published under the title 'Pakistan or the Partition of India' in 1945
7. 'Ranade, Gandhi and Jinnah' - First published in book form in 1943.
8. 'What Congress and Gandhi have done to the untouchables' - June 1945.

9. 'Who were the Shudras?' - Thacker and Co. Bombay, 1946
10. 'The Untouchables' - Amrit Book Co. New Delhi, October 1948.
11. 'Maharashtra as a Linguistic Province' - Thacker & Co. Bombay, 1948.
12. 'The Buddha and His Dhamma' – 1957
13. Dr. Ambedkar's unpublished books published by Government of Maharashtra.
1. Philosophy of Hinduism - 1987
2. Buddha or Karl Marx
3. Riddles in Hinduism
4. Pali Grammar – 1998
5. Pali Dictionary

१४. 'बुध्द पूजा पाठ' –डॉ. बाबासाहेब आंबेडकर, १९५६
१५. पाकिस्तान अर्थात भारताची गाळणी – रघुवंश पुणे, १९४०
१६. डॉ. आंबेडकर यांची पत्रे – संपादकः शंकरराव खरात, ठोकळ प्रकाशन पुणे, १९६१

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषिके –

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र–साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन यांनी प्रकाशित केलेले खंड पुढीलप्रमाणे –

१७. खंड–१ : भारतातील जाती आणि इतर ११ निबंध
१८. खंड–२ : मुंबई विधीमंडळामध्ये डॉ. आंबेडकर
१९. खंड–३ : हिंदुत्वाचे तत्वज्ञान
२०. खंड–४ : हिंदूधर्मातील कूटप्रश्न
२१. खंड–५ : अस्पृश्य आणि अस्पृश्यता
२२. खंड–६ : रुपयाचा प्रश्न
२३. खंड–७ : शुद्र पूर्वी कोण होते?
२४. खंड–८ : पाकिस्तान
२५. खंड–९ : गांधी आणि कॉंग्रेस यांनी अस्पृश्यांचे काय केले?
२६. खंड–१० : मजूर मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर
२७. खंड–११ : बुध्द आणि त्यांचा धम्म
२८. खंड–१२ : अप्रकाशित साहित्य
२९. खंड–१३ : भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
३०. खंड–१४ (दोन भागात)ः हिंदू कोड बिल
३१. खंड–१५ : कायदेमंत्री डॉ. आंबेडकर
३२. खंड–१६ : पाली व्याकरण आणि शब्दकोश
३३. खंड–१७ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक क्रांती –भाग १ ते ३
३४. खंड–१८ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे –भाग १ ते ३
३५. खंड–१९ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता १९२०–१९२८ (टीप – खंड १ ते १७ हे इंग्रजी भाषेत तर खंड १८ व १९ हे मराठी भाषेत आहेत)
३६. थॉट्स ऑन लिंग्विस्टिक स्टेटस् (भाषिक राज्यांबाबतचे विचार)– अनुवाद वि.तु.जााध्व, पुनर्मुद्रण – संजय कोचेकर, पँथरप्रकाशन.





ज्योती शा. मगर
ग्रंथपाल , महिला कला महाविद्यालय, बीड.